| MHAK100009122025 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०२५ मधील</u>**<br>**<u>निशाणी ०५ वरील आदेश</u>**<br>**शरद नपते ...वि... विकास**<br>**[<u>आज दिनांक १८.११.२०२५ रोजी पारित</u>]** |
|---|---|

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये वादी यांनी मौजे अंधार सांगवी, ता. पातुर जि. अकोला येथील शेत गट नं. २१/३ मधील १ हेक्टर २६ आर पैकी ०.६३ आर शेतजमीन ज्याच्या चर्तूसिमा:

पूर्वेस - सरकारी रस्ता,
पश्चिमेस - चोंडी धरण,
उत्तरेस - हिंमत नपते यांचे शेत,
दक्षीणेस - भागोराव नपते यांचे शेत,

(सविस्तर वर्णन वादी यांनी वादपत्रातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये दिलेले असून येथून पुढे सदरच्या मिळकतीस '**वाद मिळकत**' संबोधले आहे.)

**<u>वादीचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे:–</u>**

२. वादी यांच्या म्हणण्यानुसार हिंमत नपते, विश्वास नपते व शांताबाई नपते यांची सामाइक मालकिची शेत गट क्र. २१/३ मधील १ हेक्टर २६ आर एवढी जमिन होती. सदरच्या जमिनीतुन शांताबाई नपते यांनी त्यांच्या मुलांच्या हक्कात हक्क सोड करून दिला. त्यानंतर हिंमत नपते व विश्वास नपते यांनी शेत गट क्र. २१/३ मधील १ हेक्टर २६ आर ऐवढया क्षेत्रफळाची जमिन वाटणी करून ०.६३ आर एवढी जमिन हिंमत नपते यांच्या हिस्स्यावर आली. तसेच वादी यांचे वडील विश्वास नपते यांच्या नावेसुध्दा ०.६३ आर एवढी जमिन आली. त्यानंतर वादीचे वडिलांनी दि. ०८.०५.२०२५ रोजी बक्षिसपत्राव्दारे वादी यांच्या नावे करून दिली. तेव्हापासुन वादी हे वाद मिळकतीचे ताबेदार आहेत.

३. विश्वास नपते यांच्या मालकीची चारमोळी शेत शिवरात शेत गट क्र. ३१/२ मधील २ हेक्टर २३ आर जमिनीची वाटणी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये करून दिली व त्यानुसार ०.६१ आर वादी यांना व तेवढीच प्रतिवादी यांना देण्यात आली. उर्वरित जमिन ही वादीच्या वडीलांनी त्यांच्या ताब्यात ठेवली. वाद मिळकत ही वादी यांच्या ताब्यात असुन दि. ०५.०७.२०२५ रोजी वादी व त्यांचे आईवडील हे वाद मिळकतीमध्ये सकाळी ११ :०० वाजता हजर असतांना प्रतिवादी यांनी त्यांच्या वडिलांना धमकी दिली की, शेत त्यांच्या नावावर नाही

करून दिले तर ते वादीला व त्यांच्या वडिलांना मारून टाकतील. वादी यांनी वाद मिळकतीमध्ये सोयाबीन व तुरीची पेरणी केलेली आहे. वादी यांनी प्रतिवादी यांच्यविरूध्द रिपोर्ट दिला, परंतु त्यावर कुठलीही कार्यवाही झाली नाही.प्रतिवादी यांना वाद मिळकतीवर कुठलाही हक्क अधिकार नसतांना वादी यांच्या शांततामय ताब्यास हरकत व अडथळा निर्माण करत आहेत. अशा परिस्थीत प्रतिवादी यांना तात्पुरत्या स्वरूपात वादमिळकतीवरील तसेच वादी यांच्या ताब्यास हरकत हरकत अडथळा निर्माण करू नये असा मनाई हुकूम मिळण्याची केली.

## प्रतिवादींचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे

**४.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या प्रकरणात हजर होउन नि.१3 वर त्यांचे म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी व त्यांचे वडील विश्वास नपते यांना वादमिळकत ही वडीलोपार्जीत वारसा हक्काने मिळाली असुन त्यामध्ये प्रतिवादी यांचा सुध्दा हक्क वा अधिकार आहे. वादी व प्रतिवादी यांचे वडील विश्वास नपते यांना प्रतिवादी यांचा हक्क डावलण्याच्या उद्देशाने दिनांक ०८.०५.२०२५ रोजी खोटे व नाममात्र बक्षीसपत्र करून वादी यांना जमीन हंस्तातरीत केली. सदरची जमीन ही वडीलोपार्जीत जमीन असल्यामुळे त्या जमीनीबाबत बक्षीसपत्र करण्याचा अधिकार विश्वास नपते यांना नाही. त्याच कारणाने प्रतिवादी यांनी वादी यांच्याविरूध्द दिवाणी मुकदमा क्रमांक ४०/२०२५ विकास वि. विश्वास व इतर दाखल केला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी व त्यांच्यात भुमापन क्रमांक ३१/२ मधील जमीनीची वाटणी झाली असून त्यानुसार ०.६१ आर जमीन ही प्रतिवादी यांना व ०.६१ आर एवढी जमीन वादी यांना देण्यात आली आहे. उर्वरित १ हेक्टर १ आर जमीन हे त्यांचे वडील विश्वास नपते यांची नोंद आहे. जमीनीतील वादमिळकत ही प्रतिवादी यांना तोंडी वादपत्राने देण्यात आली होती व त्यानुसार ते आजरोजी वादमिळकतीचे ताबेदार आहेत. प्रतिवादी हे सदरची वादमिळकत आज रोजी वहीती करत आहेत व वादी यांचा वादमिहळकतीवर कुठलाही हक्क वा अधिकार नाही. अशा परिस्थीतीत वादी यांच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरून निघनारे नुकसान होउ शकते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**५.** दिवाणी न्यायालयाला ज्या ज्या वेळी तात्पुरत्या मनाई हूकुमाच्या अर्जाचा विचार करावयाचा असतो, त्या त्या वेळी तीन बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. **प्रथमदर्शनी वाद**, **सुलभतेचा समतोल** आणि **अपरिमीत नुकसान** या तीन

मुख्य घटकांसोबतच अन्य संबंध घटकांचा विचार करुन मनाईहूकुमाची मागणी मंजुर करता येईल अथवा नाही, हे न्यायालयाला तपासावे लागते. त्यामुळे ह्या अर्जाचा विचार करतांना सदर तीन मुख्य घटकांच्या अनुषंगाने विचाराधीन पुढील प्रश्न निर्माण होतात. या प्रकरणातील उपलब्ध दस्तावेज, सुनावणीवेळी उभय पक्षाच्या सुविद्य विधीज्ञांनी केलेले युक्तिवाद आणि आवश्यक त्या सर्व बाबींचा विचार करता आज या प्रश्नांबाबत निर्णय नोंदविलेले आहेत. त्यामागील कारणमिमांसा यापुढील उत्तरार्धात शब्दबद्ध केली आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी प्रकरण वादीच्या बाजूने आहे काय ? | होय. |
| २ | न्याय तराजू वादीच्या बाजूने आहे काय? | होय. |
| ३ | मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होउ शकते काय ? | होय. |
| ४ | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

## युक्तिवाद

**६.** वादीतर्फे विधीज्ञ श्री ताजने यांनी युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटणीपत्र झाले असुन त्यानुसार शेत गट क्रमांक ३१/०२ मधील ०.६१ आर एवढी जमीन वादी व प्रतिवादी यांच्या ताब्यामध्ये आहे. वादमिळकत ही वादी यांच्या वडीलांच्या नावे होती व त्यांनी दिनांक ०८.५.२०२५ रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्राव्दारे वादमिळकत वादी यांना करून दिली. सदरची बाब बक्षीसपत्रावर वादी यांनी सिध्द केली आहे. त्यानुसार वादी यांनी फेरफार सुध्दा अभिलेखावर दाखल केला असून वादमिळकतीचा ७/१२ उतारा तसेच सेंन्ट्ल बँकेचे पत्र, इ. दस्तांवर वादी यांनी ताबा सिध्द केला आहे. वादीतर्फे असा युक्तीवाद केला की प्रतिवादी हे कुठलाही हक्क वा अधिकार नसुन वादी यांनी पेरलेली वादमिळकत व त्यावरील ताब्यास प्रतिवादी हकरत अडथहा निर्माण करत आहेत व त्याबाबत वादी यांनी चान्नी पो.स्टे. येथे अदखलपात्र गुन्हयाची नोंद केलेली आहे. प्रकरणात प्रतिवादी यांना तात्पुरत्या मनाईहुकूमाने न रोखल्यास वादी यांचे अपरिमीत नुकसान होउ शकते. याउलट प्रतिवादी यांचे कुठलेही नुकसान होणार नाही त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

७.  प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री थिटे यांनी युक्तीवाद केला की, वादमिळकत ही वडीलोपार्जीत मालमत्ता आहे त्यामुळे विश्वास नपते यांना बक्षीसपत्र करण्याचा कुठलाही अधिकार नाही. सदारचे बक्षीसपत्र हे प्रतिवादी यांचा हक्क दावळण्याकरीता केले आहे. मुळात प्रतिवादी यांना तोंडी वाटणीपत्रानुसार ते वादमिळकत मिळाली असून ते आजरोजी वादमिळकतीचे ताबेदार आहेत. तीमुळे प्रतिवादि यांनी वादी यांच्या विरुद्ध दिवाणी दावा दाखल केला असून तो आज रोजी प्रलंबित आहे. वादी यांना वादमिळकतीवर कुठलाही हक्क वा अधिकार नाही. अशा परिस्थीतीत वादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता</u>:

८.  वरील तीनही मुद्दे एकमेकाशी संलग्नीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चेला घेण्यात येते. आपल्या माननीय सर्वोच्च न्यायालयाने **मार्टिन बर्न लि. वि. आर्. एन्. बॅनर्जी** या प्रकरणात प्रथमदर्शनी वाद म्हणजे नक्की काय हे परिभाषित केले आहे. त्यातील या संज्ञेचा संदर्भ वेगळा असला तरी मनाईहूकुमाच्या अर्जाबाबत देखील ही परिभाषा मार्गदर्शक ठरते. उपरोक्त प्रकरणातील निरीक्षणे व त्यांचा सुयोग्य मराठी अनुवाद असा आहे की–

> *“A prima facie case does not mean a case proved to the hilt but a case which can be said to be established if the evidence which is led in support of the same were believed. While determining whether a prima facie case had been made out the relevant consideration is whether on the evidence led it was possible to arrive at the conclusion in question and not whether that was the only conclusion which could be arrived at on that evidence.”*
>
> *"एखाद्याने त्या तथ्याबाबत समर्पक पुरावा सादर करुन ते सक्तपणे शाबीत केले तरच प्रथमदर्शनी वाद सिद्ध झाला असे म्हटले जाऊ शकत नाही. किंबहुना, अशा सादर केलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवला असता ते मांडलेले तथ्य प्रस्थापित होऊ शकत असल्यास प्रथमदर्शनी वाद प्रस्थापित झाला असे म्हणता येईल. प्रथमदर्शनी वादाबाबत विचार करतांना पुराव्याद्वारे त्या तथ्याबाबतच निष्कर्ष मांडता येईल यापेक्षा पुराव्याद्वारे त्या तथ्याबाबत निष्कर्ष मांडणे शक्य आहे अथवा नाही हे तपासणे न्यायोचित व समर्पक ठरते."*

९.		याआधारे प्रथमदर्शनी वाद म्हणजे काय, याचे सहजतेने आकलन होते. त्यासोबतच, न्यायालयाने हस्तक्षेप करावा असा प्रश्न मनाई हुकूम मागणाऱ्या पक्षाने उपस्थित केला आहे, हे दिसुन येत असल्यास, त्या पक्षाने प्रथमदर्शनी वाद प्रस्थापित केला असे मानता येईल. या दाव्यातील वादकथनांचा विचार केल्यास वादीने वाद मिळकतीवर असलेल्या त्यांच्या ताब्यास प्रतिवादी अडथळा निर्माण करीत आहे, हे विश्वास ठेवता येईल, अशा पुराव्याद्वारे मांडणे आवश्यक होते. प्रतिवादींनी देखील पर्यायाने वादीच्या ताब्याच्या कथनाचे खंडन होईल इतपत पुरावा देणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत, वादी व प्रतिवादी यांनी सादर केलेले दस्ताएवेज आणि त्यांची वादकथने याआधारे प्रथमदर्शनी वाद प्रस्थापित झाला आहे किंवा कसे हे ठरवावे लागेल.

**१०.**		प्रस्तुतच्या प्रकरणात वादी यांनी त्यांचा ताबा दर्शविण्याकरीता गट नं. २१/३ चा सातबारा उता-याची प्रत तसेच फेरफार क्र. १२८० आणि फेरफार क्र. १२८५ ची प्रत दाखल केली आहे. त्याचबरोबर गट नं. २१/३ चा सातबारा उता-याच्या प्रती आणि दि. ०७.०५.२०२५ रोजीचे वादी यांच्या पक्षातील नोंदणीकृत बक्षिसपत्र ची प्रत दाखल केली. वादी यांनी बक्षिसपत्राला अनुसरून झालेल्या फेरफार क्र. १३९० ची प्रत तसेच सातबारा उता-याची प्रत दाखल केली. प्रथमदर्शनी वादी यांनी दाखल केलेल्या दस्तांवरून असे दिसुन येते की, शांताबाई नपते यांनी त्यांची मुलं हिम्मत व विश्वास नपते यांच्या पक्षात त्यांचा हिस्सा सोडुन दिला. त्यानंतर गंगाराम नपते व विश्वास नपते यांनी आपसात वाटणी करून जमिनीचा उपभोग घेतला. दि. ०७.०५.२०२५ च्या बक्षिसपत्रानुसार विश्वास नपते यांनी वादीच्या पक्षात बक्षिसपत्र करून दिले व त्याबाबतचा फेरफार व सातबारा उतारा तयार झाला.

**११.**		प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या जबाबावरून प्रतिवादी हे एका ठिकाणी वाद मिळकत ही वडिलोपार्जित असल्यामुळे त्यामध्ये त्यांचाही हक्क असल्याचे सांगत आहे तर दुस-या ठिकाणी सदरची वाद मिळकत ही प्रतिवादी यांना तोंडी वाटणी पत्राव्दारे दिल्याचे सांगत आहे. त्याचबरोबर प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार तोंडी वाटपानुसार ते आजरोजी वाद मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. जरी या घडीला वाद मिळकत ही वडिलोपार्जित आहे किंवा कसे याबाबत वाद उपस्थित होत असला तरी, मनाई हुकुमाच्या दाव्यामध्ये त्याचबरोबर तात्पुरता मनाई हुकुम देतेवेळी केवळ ताबा पाहणे महत्वाचे ठरते. येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी यांनी हे मान्य केले की, वादी व त्यांच्यात गट

नंबर ३१/२ मधील क्षेत्रात वाटप झालेले आहे. या वरून वादी आणि प्रतिवादी यांच्यात वाटप झाल्याचे दिसते. असे असले तरी मात्र वादमिळकत बाबत वाटप झाले किंवा कसे हे या घडीला ठरविणे योग्य नाही.

**१२.** वादी व प्रतिवादी यांच्या कथनानुसार आजपर्यंत त्यांच्यामध्ये वाटणी झाली किंवा कसे याबाबत अभिलेखावर कुठलाही दस्त आलेला नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कुठली कौटुंबिक व्यवस्था दस्तऐवज अभिलेखावर आलेला नाही त्यामुळे आजरोजी सदरची वाद मिळकत ही वडिलोपार्जित आहे किंवा कसे तसेच वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा हक्क व अधिकार आहे किंवा कसे हे ठरविता येणार नाही. त्यामुळे आज घडीला प्रकरणात वाद मिळकतीवरील ताबा ठरविणे न्यायोचित ठरते.

**१३.** वादी व प्रतिवादी यांनी ते वाद मिळकतीचे ताबेदार असल्याबाबत म्हटले असले तरी वादी यांनी दाखल केलेले सातबारे उतारे, फेरफार व नोंदणीकृत बक्षिसपत्र यावरून वादी हे वाद मिळकतीचे ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादी यांनी त्यांच्या तोंडी कथना व्यतिरिक्त इतर कुठलाही दस्त अथवा प्रतिज्ञालेख अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रकरणात प्रतिवादी हे वाद मिळकतीचे ताबेदार असल्याचे दिसुन येत नाही.

**१४.** प्रकरणमध्ये वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी हे त्यांच्या ताब्यास हरकत अडथळा निर्माण करत आहेत. वादी यांनी प्रकरणामध्ये प्रतिवादी यांच्या हातून होत असल्याबाबत तारखेसह नमूद केलेले आहे. तसेच, सदरची बाब सिध्द करण्यासाठी त्यांनी अभिलेखावर दि. ०५.०७.२०२५ रोजीचे अदखलपात्र गुन्हयाची प्रत दाखल केलेली आहे. ज्याअर्थी प्रथमदर्शनी वादी हे वाद मिळकतीचे ताबेदार असल्याचे दिसुन येत आहे. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाच्या प्रतिवादी हे त्यांच्या ताब्यास हरकत अडथळा निर्माण करत असल्याचे दिसुन येते.

**१५.** एकंदरीत अभिलेखावर दाखल असलेल्या दस्तऐवजांवरून प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी हे आजरोजी वादमिळकतीचे ताबेदार आहेत. त्यामुळे वादी प्रथमदर्शनी हे सिध्द करण्यास यशस्वी ठरले की, ते वादमिळकतीचे ताबेदार असून प्रतिवादी हे त्यांना कुठलाही अधिकार नसतांना वादी यांच्या ताब्यास हरकत अडथळा निर्माण करत आहेत. तसेच प्रतिवादी यांच्या हरकतीमुळे वादी यांचे अपरिमीत नुकसान होत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे हाती असलेल्या प्रकरणात **प्रथमदर्शनी वाद**, **सुलभतेचा समतोल** आणि

**अपरिमीत नुकसान** या तीनही मुख्य घटक  वादी यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर  होकारार्थी देत असून मुद्दा क्र. ४ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे. परिणामकारक आदेश पारित करण्यापूर्वी हे स्पष्ट करणे गरजेचे आहे की, या आदेशातील निष्कर्ष तथा निर्णय हे पूर्णतः प्रकरणाच्या अंतरिम टप्प्यावर उपलब्ध असलेल्या दस्त व युक्तीवादाच्या प्रथमदर्शनी परिनिरीक्षणावर आधारित आहेत व या दाव्याला पूर्णतः निकाली करतांना सदर निष्कर्ष तथा निर्णयांचा प्रभाव असणार नाही अगर कुणी तसा अन्वयार्थ लावु नये, याची प्रकरणातील उभय पक्षांनी नोंद घ्यावी.

## आदेश

**१.** सदरचा तात्पुरता मनाई हुकूम मागणीचा अर्ज **मंजुर** करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही वादी यांच्या वादमिळकतीवरील ताब्यास सदरहू आदेश अस्तीत्वात असे पर्यंत कुठल्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करू नये.

**३.** वादीच्या प्रस्तुत अर्जाचा खर्च मुळ वाद खर्चात समाविष्ट होईल.

[ आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

PRASAD SAHEBRAO THAKARE

Digitally signed by PRASAD SAHEBRAO THAKARE
Date: 2025.11.20 11:18:06 +0530

दिनांक १८.११.२०२५

**[प्रसाद एस. ठाकरे]**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पातुर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original .

Name of Stenographer : K.M.Mahalle
Court Name : P. S. Thakare, C.J.J.D. & J.M.F.C., Patur
Date : 18.11.2025
Signed by presiding officer on : 18.11.2025
Uploaded on : 20.11.2025